# <u>मोटार अपघात दावा क्र.१६९/२०२२ आरती वि. गणेश व इतर</u>
## <u>नि.२८ वरील आदेश</u>

१. प्रस्तुत अर्जाद्वारे गैरअर्जदार क्र.१ यांनी दिनांक ०९.१२.२०२२ रोजी त्यांचेविरुध्द पारीत झालेला विना जबाब आदेश रद्द करण्यात येवून त्यांचे म्हणणे व कैफियत स्विकारणेत यावी, अशी मागणी केली आहे.

२. गैरअर्जदाराचे म्हणणे असे की, गैरअर्जदाराला प्रकरणाची नोटीस मिळालेली आहे, परंतु त्याचे मणक्याचे ऑपरेशन झाल्यामुळे तो बाहेरगावी गेला होता व दोन महिने हॉस्पिटलमध्ये ॲडमीट होता, त्यामुळे मुदतीत त्याचे लेखी म्हणणे तो दाखल करु शकला नाही. लेखी म्हणणे व कैफियत उशीराने दाखल करण्याचा गैरअर्जदाराचा कोणताही गैरउद्देश व हेतू नव्हता.

३. अर्जदार यांनी अर्जावर त्यांचे म्हणणे दाखल करुन गैरअर्जदाराच्या मागणीस विरोध केला आहे. अर्जदाराचे म्हणणे असे की, प्रस्तुत अर्जात नमूद केलेल्या कारणानुसार गैरअर्जदाराने वैद्यकीय प्रमाणपत्र दाखल केल्याचे दिसून येत नाही. तरी रु.,२०००/- चा खर्च लावून योग्य तो आदेश पारीत करण्यात यावा, अशी विनंती केली आहे.

४. अभिलेखावरुन असे दिसून येते की, गैरअर्जदार हे वकीलामार्फत दिनांक १९.०९.२०२२ रोजी हजर झाले. त्यानंतर पुरेशी संधी देवून देखील गैरअर्जदार यांनी त्यांचा लेखी जबाब व म्हणणे दाखल केले नाही. प्रस्तुत अर्जास क्लेमंटने दिलेले लेखी म्हणण्याप्रमाणे अर्जातील कथनापुष्ठयर्थ वैद्यकीय कागदपत्र दाखल करण्यात आलेली नाहीत. असे असले तरी, प्रस्तुत अर्जातील कथनापुष्ठयर्थ गैरअर्जदाराने शपथपत्र दाखल केल्याची

बाब दुर्लक्षीत करता येणार नाही. मणक्याची शस्त्रक्रिया झाल्यामुळे बाहेरगावी होते, याबाबतचे कथनास गैरअर्जदाराचे शपथपत्राद्वारे पुष्टी मिळते. शपथपत्राने पुष्टी दिलेले कथन व प्रस्तुत अर्जासोबत त्यांचे लेखी म्हणणे व कैफियत दाखल केल्याचे तथ्य व २,०००/– रुपये दंड आकारण्याबाबतचे अर्जदाराचे पर्यायी म्हणणे विचारात घेता, तसेच प्रस्तुत प्रकरणाचा न्यायनिवाडा गुण–दोषावर होणेकामी गैरअर्जदार यांचे म्हणणे व कैफियत फैलावर घेणे न्यायोचित ठरेल. लेखी म्हणणे दाखल करण्यास गैरअर्जदाराकडून झालेल्या विलंबाची भरपाई खर्च (costs) लादून करता येईल. सबब आदेश.

## आदेश

१. अर्ज रुपये २००/– खर्चाच्या (costs) अटीवर मंजूर करण्यात येतो.
२. सदर खर्चाची (costs) रक्कम अर्जदार यांना देण्यात यावी.

स्वाक्षरीत/–
(ए.व्ही.चौधरी–ईनामदार)
सदस्य, मोटार अपघात दावा
न्यायाधीकरण, जालना

दिनांक १५.१२.२०२२